**प्रेसनोट** दि. 02/09/2026

| अ.क्र | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | घटक | **पुणे घटक** |
| 2 | तक्रारदार | पुरुष, वय 47 वर्षे |
| 3 | आरोपी | विजय मल्हारी खळदकर, वय- 57 वर्षे, व्यवसाय- शासकीय कागदपत्रे काढुन देणे, रा. मु पो कुंभार वळण , ता. पुरंदर, जि. पुणे |
| 4 | तक्रार | **तक्रार**- दिनांक 01/09/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे वडीलोपार्जित पुरंदर, जिल्हा पुणे येथे गट नंबर 769 मधील जमिनीच्या असमान हिस्साची सुनावणी तहसीलदार पुरंदर यांचे न्यायालयात सुरू होती. दिनांक 24/06/2026 रोजी तहसीलदार पुरंदर यांनी वादी व प्रतिवादी यांना समान संधी देऊन प्रकरण बंद केल्याचे सांगितले. परंतु अद्याप आदेश देण्यात आले नव्हते. सदर आदेशाबाबत विचारपूस करणे करिता तक्रारदार हे दिनांक 29/08/2026 रोजी तहसील कार्यालय पुरंदर, जिल्हा पुणे येथे गेले असता त्यांची भेट क्लार्क खळदकर यांच्याशी झाली त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की मला तुमचे प्रकरण तहसीलदार यांचे पुढे ठेवण्याकरिता 5,000/- रुपये द्यावे लागतील असे म्हणुन लाच मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी तक्रार दिलेली होती. |
| 5 | तक्रारीची पडताळणी | तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दिनांक 02/09/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, तहसिलदार कार्यालय, पुरंदर आवारात क्लार्क विजय खळदकर यांनी तक्रारदार यांचे वडीलोपार्जित जमिनीच्या सुनावणीचे आदेश तहसीलदार यांच्याकडून प्राप्त करून देणे करिता 25,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. |
| 6 | सापळा कार्यवाही | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट कडून दिनांक 02/09/2026 रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता, यातील क्लार्क विजय खळदकर यांनी तक्रारदार यांचे प्रकरणात लवकरात लवकर आदेश तहसीलदार यांचेकडून मिळवून देण्याकरिता 25,000/- रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारली असता त्यांना तहसिलदार कार्यालय, पुरंदर समोरील रोहीत हॉटेलपुढे, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे येथून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सापळा कारवाई नंतर क्लार्क खळदकर हे खाजगी इसम असल्याचे निष्पन्न झाले आहे. |
| 7 | गुन्हा रजिस्टर नं./ कलम/पोलीस स्टेशन/ जिल्हा,दिनांक व वेळ | सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 च्या कलम 7 (अ) अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| 8 | आरोपी अटक दिनांक,वेळ | आरोपी लोकसेवक यास आज दिनांक 02/09/2026 रोजी 14.01 वाजता ताब्यात घेण्यात आले आहे. |
| 9 | सापळा अधिकारी | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 9860667770 |
| 10 | पर्यवेक्षण अधिकारी | श्री. सतिश वाळके, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 8087002020 |
| 11 | सापळा पथक | 1) पो.हवा.बाळासाहेब गदादे, 2) पो.हवा. दीपक काकडे<br>3) पो.कॉ.रवी दिवेकर, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे. |
| 12 | मार्गदर्शन | 1)श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.पुणे, मो.नं. -9823167154<br>2)श्री.अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक-1,ला.प्र.वि.पुणे,मो.नं. 9029030530 |

| | |
|---|---|
| 13 | लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा. |

| | **घटक कार्यालय** | **परिक्षेत्र कार्यालय** | **ला.प्र.वि, मुख्यालय** |
|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 |
| पत्ता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालय, सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 411001 | पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र,सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 01 | ला.प्र. वि. मुख्यालय कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, 400030 |
| दुरध्वनी क्रमांक, व्हॉटसअप क्रमांक | (020)26132802, व्हॉटस्अॅप क्र.9403781064, 1064 | (020) 26122134, 1064 | (022) 24921212 |
| ई- मेल आय.डी. | dyspacbpune@mahapolice.gov.in | spacbpune@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

सहायक पो आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक * ॲन्टी करप्शन ब्युरो *
सत्यमेव जयते

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे